# मुंबई विद्यापीठ

**परिपत्रक क्र. सीटीएयु/ ८१७ /२०२०–२०२१**

**विषय:– जेष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस ''मराठी भाषा गौरव दिन'' म्हणून साजरा करणेबाबत.....**

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय/अशासकीय, अनुदानित व विनाअनुदानित मानव्य विद्या, वाणिज्य व व्यवस्थापन, विज्ञान व तंत्रज्ञान तसेच आंतर विद्याशाखा या विद्याशाखांमधील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य तसेच मॉडेल डिग्री महाविद्यालये, वसतिगृहे व परिसंस्था व संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल यांचे पत्र क्र. विससं/उशि/कोविप/मशि/२०२१/३८२ दिनांक २२/०२/२०२१ सोबत शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. मभादि/–०४२१/प्र.क्र. ०२/मवि–१/२०८९ दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या द्वारे जेष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने कोव्हिड–१९ च्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाच्या वेळोवळी सुचनांप्रमाणे सर्व प्रतिबंधक उपायांचे पालन करून दिनांक २७ फेब्रुवारी, २०२१ रोजी जेष्ठ कवी वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्यात यावा.

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– २५ फेब्रुवारी, २०२१

( डॉ. बळीराम गायकवाड)
प्र. कुलसचिव